Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५/413 दिनांक : १७.०५.२०२५

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक/परीक्षा केंद्र प्रमुख,**
**सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय : बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्ष प्रथम व व्दितीय सत्र (NEP 2020 Pattern) अभ्यासक्रमांच्या मूल्यमापन झालेल्या उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या व इतर दस्तऐवज जमा करणेबाबत.**

संदर्भ : १. परीक्षा/समन्वय/२०२४/३२७, दि. १०.०९.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली कार्यपध्दती.
२. परीक्षा/समन्वय/२०२५/९९१, दि. २६.०३.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले पत्र.
३. परीक्षा/समन्वय/२०२५/३२१, दि. १९.०४.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले वेळापत्रक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्ष प्रथम व व्दितीय सत्र (NEP 2020 Pattern)** अभ्यासक्रमांच्या मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये होणाऱ्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करुन निकाल घोषित (Home Center & Home Assessment) करण्यात याव्यात व सदर प्रक्रिया ही प्रस्तुत विद्यापीठाने विहित करुन दिल्याप्रमाणे करण्यात यावी असे (संदर्भिय पत्र क्र. ०२ अन्वये) सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे व संदर्भिय पत्र क्र. ०३ अन्वये उत्तरपत्रिका मूल्यमापन पूर्ण करणे व इतर अनुषंगीक बाबींबाबत कार्यवाही करण्यासाठी वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

**त्यानुसार बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम वर्ष प्रथम व व्दितीय सत्र (NEP 2020 Pattern) अभ्यासक्रमांच्या मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये संपन्न झालेल्या परीक्षांच्या छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व धाराशिव जिल्हा (शहर व ग्रामीण) येथील सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक यांना मूल्यमापन झालेल्या उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या तसेच परीक्षेसंबंधीचे आवश्यक दस्तऐवज राजर्षी शाहू महाराज परीक्षा भवन, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर येथे सादर करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेल्या तारखा कळविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | दिनांक | अभ्यासक्रमांचे नाव |
|---|---|---|---|
| १. | छत्रपती संभाजीनगर (शहर व ग्रामीण) | २९.०५.२०२५ | B.A. I & II Sem<br>B.Com. I & II Sem<br>B.Sc. I & II Sem |
| २. | जालना (शहर व ग्रामीण) | ३०.०५.२०२५ | |
| ३. | बीड (शहर व ग्रामीण) | ३१.०५.२०२५ | |
| ४. | धाराशिव (शहर व ग्रामीण) | ०२.०६.२०२५ | |

कृ.मा.पहा

तसेच सर्व संबंधित परीक्षा केंद्रांना उत्तरपत्रिका, गुणयाद्या व ऑनलाईन नोंदणी केलेल्या गुणयाद्या व इतर दस्तऐवज संकलन केंद्रावर जमा करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या नियमप्रमाणे प्रवास व दैनंदिन भत्ता (By Bus) देण्यात येईल व परीक्षा केंद्रावरील उत्तरपत्रिकांची संख्या जास्त असल्यास किंवा एकाच शहरातील, तालुक्यातील अंदाजे ४ ते ५ महाविद्यालयांनी एकत्रित प्रवास करण्याचे नियोजन केल्यास प्रस्तुत विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे गाडी भाडे (Car Fare) देण्यात येईल.

उत्तरपत्रिका व इतर दस्तऐवज परीक्षा विभागाच्या दुसऱ्या मजल्यावर घेऊन जाण्यासाठी हमाली पोटी एका दिवसासाठी एकाच प्रतिनिधीस रु. १००/- देण्यात येईल. सदर देयकाचा समावेश ज्या-त्या महाविद्यालयाच्या प्रतिनिधीच्या प्रवास व निवासी भत्ते देयकामध्ये समाविष्ठ करण्यात यावेत. सदर देयके संबंधित कक्षामध्ये सादर करण्यात यावे. हमाल आणण्याची किंवा उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबधित महाविद्यालयाच्या प्रतिनिधीची राहील.

करिता, सर्व संबधित महाविद्यालय/परिसंस्था/परीक्षा केंद्रांनी उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन मूल्यमापन झालेल्या उत्तरपत्रिका, मुळ गुणयाद्या, ऑनलाईन नोंदणी करुन प्रिंट काढलेल्या गुण याद्या व इतर दस्तऐवज विहित करुन दिलेल्या पध्दतीनुसार निश्चित करुन दिलेल्या ज्या-त्या तारखेलाच सादर करण्यात यावे; ही विनंती.

संचालक
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

यापत्राची प्रत : कक्ष प्रमुख, सर्व संबंधित कक्ष, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, उपरोक्त नमूद दस्तऐवज स्विकारण्याकरिता परीक्षा विभागांच्या दुसऱ्या मजल्यावर जिल्हा निहाय व्यवस्थापन करुन आपल्या कक्षातील कर्मचारी सदर कार्यासाठी नियुक्त करण्यात यावे व दस्तएवेज परीक्षा व मूल्यांकन गुणवत्ता पडताळणी समिती मार्फत प्रमाणित करुन घेण्यात यावे व महाविद्यालय/परिसंस्थेच्या प्रतिनिधींची देयके पुढील कार्यवाहीस्तव लेखा व वित्त विभाग, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे वर्ग करण्यात यावे.